www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-४४ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २१ जुलै २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -६

"आपण एकटे असलो तरी हरकत नाही. आपल्यामागे कुणी येवो ना येवो, जे आपल्याला करावंसं वाटतं ते करण्यातच आपल्या जीवनाची सार्थकता आहे.

- विनायक दामोदर सावरकर

## धक्कादायक! छत्रपती संभाजीनगरमध्ये तीन बालकांना अचानक लुळेपणा, अशक्तपणा

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

फुलंब्री तालुक्यातील पाथरी येथील खंबाट वस्तीत एकाच कुटुंबातील तीन मुलांना लुळेपणा आणि अशक्तपणा आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली. अडीच वर्षांचा एक, नऊ वर्षांचा दुसरा आणि अकरा वर्षांचा तिसरा मुलगा, अशा तिघांना छत्रपती संभाजीनगरच्या एका खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले आहे. या घटनेनंतर आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून गावात सर्वेक्षण आणि उपाययोजना सुरू आहेत. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी नागरिकांना घाबरू नये, काळजी घ्यावी असे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खंबाट वस्तीमध्ये तीन मुलांना अचानक लुळेपणा आणि अशक्तपणाची लक्षणे दिसली. याबाबतची माहिती समोर आल्यानंतर आरोग्य विभाग तातडीने कामाला लागला आहे. दोन दिवसांपूर्वी एका मुलालाही लक्षणे जाणवली. त्याला लगेच रुग्णालयात दाखल केले. त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. डॉक्टरांच्या अंदाजानुसार त्याला जीबीएस (GBS) नसावा. त्यानंतर आणखी दोन मुलांना अशीच लक्षणे दिसली. त्यांच्यावरही उपचार सुरू आहेत आणि त्यांची प्रकृती सुधारत आहे. त्यामुळे त्यांनाही जीबीएस नसावा, असा अंदाज आहे.

पाथ्री, खंबाट वस्ती येथील ३ बालकांना अचानक लूळेपणा व अशक्तपणाची लक्षणे दिसून आली. सदर बालकांना तातडीने डॉ. हेडगेवार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

रुग्णालयात जाऊन या बालकांची आमदार अनुराधाताई यांनी भेट घेतली व उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी चर्चा करून त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती जाणून घेतली. तसेच नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी महत्त्वाची आहे. त्यामुळे वाड्या-वस्त्यांवरील पाण्याची तपासणी करण्याची व आजाराबाबत अधिक तपासणी करण्याचे आदेश आरोग्य विभागाला देण्यात आले आहे. सर्वांच्या सहकार्याने या प्रकाराचा मुळापर्यंत शोध घेऊन योग्य ती खबरदारी घेतली जाईल, असे आश्वासन संबंधित परिवाराला दिले आहेत. या प्रकाराची सखोल चौकशी करून मूळापर्यंत शोध घेण्यात येईल आणि आवश्यक त्या सर्व खबरदारीची उपाययोजना केली जाईल, असे आश्वासन प्रशासनाने संबंधित परिवाराला दिले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता दक्ष राहावे आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




रुग्णालयात जाऊन या बालकांची आमदार अनुराधाताई यांनी भेट घेतली व उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी चर्चा करून त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती जाणून घेतली.

## कामाचा ताण सहन होत नसल्यामुळे बारामतीत बँक अधिकाऱ्याची शाखेतच आत्महत्या

पुणे - कामाचा ताण सहन होत नसल्यामुळे पुणे जिल्ह्यातील एका बँक अधिकाऱ्याने शुक्रवारी रात्री ऑफिसमध्येच गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना बारामती शहरात घडली आहे. संबंधित कर्मचारी बँक ऑफ बडोद्याच्या बारामती शाखेमध्ये काम करीत होता. शिवशंकर मित्रा असे आत्महत्या केलेल्या बँक अधिकाऱ्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मित्रा हे बँक ऑफ बडोद्याच्या बारामती शाखेमध्ये मुख्य व्यवस्थापक म्हणून काम करीत होते. शुक्रवारी बँकेचे कामकाज संपल्यावर ते घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबियांनी पोलिसांना याबद्दल माहिती दिली. त्यानंतर बारामती पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विलास नाळे यांच्या पथकाने तपास केल्यावर त्यांना मित्रा हे बँकेच्या आवारातच गळफास लावलेल्या अवस्थेत सापडले. शुक्रवारी रात्री १० ते १२ च्या दरम्यान ही घटना घडली असावी, असा पोलिसांचा अंदाज आहे.

## हिंदी अनिवार्य नाही, पण शिकावीच लागणार; राज्य सरकारचे नवे शिक्षण धोरण

मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)

नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिलीपासूनच विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकण्याची सक्ती करण्यात आली होती. पण त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाने याला कडाडून विरोध केल्यानंतर राज्य शासनाने याबाबत लवकरच निर्णय घेऊ असे सांगितले होते. पण दुसरीकडे पहिलीपासूनच्या हिंदी भाषेच्या पुस्तकाची छपाई करण्यात आली, ज्याला पुन्हा मनसेने वाचा फोडली. पण आता राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल, असा निर्णय शासनाकडून जारी करण्यात आला आहे. पण हिंदी अनिवार्य असली तरी त्रिभाषा सूत्रानुसार पहिलीपासून विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकावीच लागणार आहे.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार, पहिलीपासूनच तीन भाषा शिकणे हे सक्तीचे करण्यात आले होते. पण या तीन भाषांमध्ये हिंदी ही भाषा असल्याने याला मनसेकडून आणि काही पालक संघटनांकडून विरोध करण्यात आला होता. पण त्रिभाषा सूत्रानुसार मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये तिसरी भाषा ही हिंदी अनिवार्य, असा शासन निर्णय केला आहे. पण महत्त्वाची बाब म्हणजे, त्रिभाषा सूत्र असल्याने मराठी, इंग्रजी आणि हिंदी या भाषा विद्यार्थ्यांना शिकाव्याच लागणार आहेत. कारण हिंदी अनिवार्य असली तरी त्रिभाषा सूत्रानुसार विद्यार्थ्यांना मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेव्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेचा पर्याय देण्यात आलेला नाही. त्यामुळे हिंदी अनिवार्य नसली तरी ती भाषा शिकावीच लागणार आहे, असे सरकारने धोरण अवलंबल्याने पालकांनी, राजकीय नेत्यांनी आणि शिक्षक संघटनांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

तसेच नव्या शासन निर्णयानुसार, मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता १ली ते ५वी साठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल, परंतु ज्या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषेऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास, त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल. एकीकडे सरकारने अन्य भाषांचा पर्याय देण्याचा प्रयत्न करत नियम ही दिला आहे. इतर भाषा शिकण्यासाठी किमान २० विद्यार्थ्यांची इच्छुकता असावी असे ही यात म्हटले आहे. इयत्ता ६वी ते १०वी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण प्रमाणे असेल. असेही सांगण्यात आले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसोबतच राज्य अभ्यासक्रम आराखडा नव्या शैक्षणिक वर्षापासून लागू करताना मराठी शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर पालकांनी, राजकीय नेत्यांनी आणि शिक्षक संघटनांनी त्याला तीव्र विरोध केला होता. याविरोधानंतर सरकारने बाजू मांडत शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय अखेर मागे घेत असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केली होती. आता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून नवा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

## आमचा चेतना स्तंभ, आमचे प्रेरणास्तंभ, जे आमचे शूरवीर आहे क्रांतिवीर आहे त्यांचा इतिहास आम्हाला उजागर करायचा आहे - संजय केणेकर

### 'जोपर्यंत वेळेवर शहराला नियमित पाणीपुरवठा होत नाही तोपर्यंत मी माझा वाढदिवस साजरा करणार नाही'

**माझ्या** वाढदिवसानिमित्त सगळ्यांना नम्र आवाहन केलं होतं की, माझा वाढदिवस मला माझ्यावर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वाढदिवसाच्या शुभेच्छा आशीर्वाद देण्यासाठी माझे सर्व प्रेमपूर्वक संदेश पाठवले होते सर्व हार बुके जाहिरात होल्डिंग कोणी करू नये असं नम्र आवाहन केलं होतं कारण यावर्षी शासकीय योजनेच्या प्रणालीतून शासकीय योजनेच्या प्रणालीतून छत्रपती संभाजीनगरची पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत आहे आणि ही योजना गतिमान होऊन पूर्ण व्हावी तसेच पूर्ण होईपर्यंत आणि जोपर्यंत वेळेवर नियमित पाणीपुरवठा नागरिकांना होत नाही. मी माझा वाढदिवस साजरा करणार नाही. तसेच मी यावेळेस विधान परिषदेबद्दल पावसाळी अधिवेशन चालू होतं ते सोडून मी सत्कार घेतला असता तर ती योग्य नसतं त्यामुळे लोकांच्या प्रश्नाला वाव वाचा फोडणे आणि न्याय देणे ही भूमिका सभागृहात मी मांडत होतो त्यामुळे वाढदिवस त्याच्यामुळे मी साजरा केला नाही आणि निश्चितपणे बऱ्याच जणांनी ते पाळलं पण बऱ्याच जणांमध्ये राहवलं नाही तरी त्यांनी केल.



तरी मी त्यांना परत सांगितलं की त्यापेक्षा 'एक पेड मा के नाम' असं वृक्ष संवर्धन करावं आणि त्या दृष्टिकोनातून वृक्ष लागवड करावी तसेच ही भूमिका घेऊन साजरा करावा. ज्या ज्या देशावर आक्रमण झाले त्या त्या देशांनी आपला इतिहास जागवला का नाही? मग आपल्या देशावर सर्व आक्रम कांनी राज्य केले व आदिलशा असो, मोगल असो, निजाम असो, बाबर असो, का इंग्रज असो या लोकांचा जर इतिहास या लोकांची संस्कृती आमच्या मनावर आणि हृदयावर जर कोरली जात असेल तर ५० वर्ष काँग्रेसला याच लोकांचा इतिहास रंगवला आणि याच लोकांचा इतिहासाला उजाळा दिला आणि त्यामुळे हे पन्नास वर्षे याच काँग्रेसने केलं आणि त्यामुळे हे मिटून टाकायचा आक्रमकांचा इतिहास घडवून टाकायचा आणि आमचा जो या देशाचा ऐतिहासिक इतिहास आहे त्याला उजागर करण्याचे काम पुण्य काम मी केलं निश्चितपणे त्याच्यातच खऱ्या अर्थानं खुलताबादचा रत्नपूर वावं, आणि संभाजी महाराजांचे विशाल भव्य स्मारक व्हावं जेणेकरून आमचा इतिहास आमची संस्कृती खऱ्या अर्थाने येणाऱ्या पिढीसमोर येईल आमचा चेतना स्तंभ, आमचे प्रेरणास्तंभ, जे आमचे शूरवीर आहे क्रांतिवीर आहे त्यांचा इतिहास आम्हाला उजागर करायचा आहे.

- दिनेश परदेशी

### अभ्यासू नेतृत्वाचे आणि प्रामाणिक कार्यसंस्कृतीचे प्रतीक असलेल्या सुधीरभाऊंच्या सदिच्छा नेहमीच प्रेरणादायी



"विधान भवन परिसरात भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते, माजी प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार साहेब यांनी मला वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. सुसंस्कृत राजकारणाचे, अभ्यासू नेतृत्वाचे आणि प्रामाणिक कार्यसंस्कृतीचे प्रतीक असलेल्या सुधीरभाऊंच्या सदिच्छा नेहमीच प्रेरणादायी ठरतात. आपल्या प्रेमळ शुभेच्छांबद्दल मन:पूर्वक आभार!

-संजय केणेकर, आमदार

## संपादकीय

# अहमदाबाद विमान अपघात ‘अहवालानंतर’चा वाद

अहमदाबादमध्ये झालेल्या ‘एअर इंडिया’च्या विमान अपघाताचा प्राथमिक तपास अहवाल अलीकडेच समोर आला. या अहवालात धक्कादायक गौप्यस्फोट आहेत. मात्र या अहवालावर तज्ज्ञ आणि वैमानिकांच्या संघटनेने आक्षेप घेतला. त्यामुळे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांनीही अहवालातून घाईघाईने निष्कर्ष काढू नका, असे जे आवाहन केले, ते अतिशय महत्त्वाचे आहे. नेमके काय घडतेय या प्रकरणात?

अहमदाबाद विमान अपघाताचा प्रारंभिक अहवाल एक महिन्यानंतर जाहीर झाला. त्यातील निष्कर्ष धक्कादायक आहेत. वैमानिकांच्या संवादाचा आधार घेऊन विमानाच्या इंजिनला इंधन पुरवठा करणारे स्विच बंद केल्याने हा अपघात झाला असल्याचे म्हटले आहे. त्यातून वैमानिकांवर खापर फोडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. या विमानाचे दोन्ही वैमानिक अनुभवी होते. त्यांच्याकडून अशी चूक होणे संभवत नाही. ‘एएआयबी’ (एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो)ने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. हे बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमान होते. या अपघातात विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला, तर बाहेरील १९ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात फक्त एकच प्रवासी वाचला. एका वैमानिकाने ‘तू स्विच बंद केले का’ अशी विचारणा केली, तर दुसऱ्याने ‘नाही’ असे उत्तर दिले. दोघांपैकी कुणी कुणाला स्विचबाबत विचारले, याचा उलगडा या अहवालातून होत नाही. या अहवालावर वैमानिक संघटनेने संताप व्यक्त केला आहे. समितीत एकही वैमानिक नव्हता आणि त्यांना विश्वासात न घेता आणि तज्ज्ञ वैमानिकाचे म्हणणे न नोंदवताच अहवालात ठपका ठेवण्यात आल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. वैमानिकांची कुटुंबे तसेच अन्य प्रवाशांच्या कुटुंबीयांनीही या अहवालावर नाराजी व्यक्त केली. स्विच कधी बंद करायचा, कधी सुरू करायचा आणि स्विच बंद केला की काय होते याचा परिणाम माहीत असलेले वैमानिक स्वतःसह शेकडो प्रवाशांचा जीव कशाला धोक्यात घालतील, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अहवालात इंधन ‘कटऑफ स्विच’ रनवरून ‘कटऑफ’मध्ये गेला होता. हा स्विच एका सेकंदात बदलण्यात आला असे म्हटले आहे. दोन्ही इंजिन्सना इंधनपुरवठा थांबला होता. त्यामुळे इंजिनची पॉवर बंद पडली, तेव्हा पंख्यासारखे एक लहान उपकरण आपोआप उघडले. याला ‘राम एअर टर्बाइन’ (रॅट) म्हणतात. ते आपत्कालीन परिस्थितीत ‘हायड्रॉलिक पॉवर’ देते. वैमानिकांनी इंजिन पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला; परंतु कोसळण्यापूर्वी ते सुरू होऊ शकले नाही.

धावपट्टीपासून ०.९ नॉटिकल मैल अंतरावर ते एका वसतिगृहावर कोसळले. ‘एएआयबी’च्या अहवालात म्हटले आहे की, वैमानिकांची पात्रता शंकेच्या पलीकडे होती आणि दोघेही निरोगी आणि पूर्णपणे तंदुरुस्त होते आणि त्यांना पुरेसा अनुभव होता. इंधन भरण्याच्या स्त्रोतांमध्येही कोणतीही भेसळ आढळली नाही. हवामान पूर्णपणे स्वच्छ होते. विमान उड्डाण करण्यासाठी फ्लॅप सेटिंग (५ अंश) आणि गियर सामान्य होते. आकाशात पक्षी नव्हते. वाराही हलका होता. दृश्यमानता चांगली होती. कोणत्याही प्रकारची कोणतीही अडचण नव्हती. वजनदेखील संतुलित होते, तरीही अपघात झाला.

इंधन स्विचमध्ये संभाव्य बिघाडाबद्दल ‘एफएए’कडून एक सल्ला देण्यात आला होता; परंतु सात वर्षांपूर्वीचा हा सल्ला ‘एअर इंडिया’ने विचारात घेतला नाही. त्या वेळी ही कंपनी भारत सरकारच्या मालकीची होती. आताच्या अहवालात म्हटले आहे की, दोन्ही वैमानिकांकडे आवश्यक परवाने होते. त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. त्यात ते निरोगी आढळले. दोन्ही वैमानिकांना विमान उडवण्याचा चांगला अनुभव होता. ‘फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन’ ही अमेरिकन सरकारी एजन्सी आणि बोईंग यांनी जारी केलेल्या एका अधिसूचनेत म्हटले आहे, की बोईंग विमानांचे इंधन स्विच लॉक पूर्णपणे सुरक्षित आहेत. इंधन नियंत्रण, स्विचचे डिझाइन, लॉकिंग वैशिष्ट्ये वेगवेगळ्या बोईंग विमानांमध्ये सारखीच आहेत. आम्ही ही धोकादायक परिस्थिती मानत नाही. अहमदाबाद-लंडन विमान अपघाताच्या प्राथमिक अहवालानंतर ‘एफएए’ आणि बोईंगने अधिसूचना जारी केली. त्यात इंजिन इंधन कटऑफ स्विचवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. ‘एअर इंडिया’ने २०१९ मध्ये ‘बोईंग’च्या सूचनांनुसार अहमदाबाद-लंडन बोईंग ७८७-८ उड्डाणाचे थ्रॉटल कंट्रोल मॉड्यूल (टीसीएम) गेल्या सहा वर्षांमध्ये दोनदा बदलले आहे. अहवालात असेही उघड झाले की, उड्डाणापूर्वी फ्लाइटच्या सेन्सरमध्ये समस्या होती. ती दुरुस्त करण्यात आली होती. प्राथमिक अहवालात कोणताही अंतिम निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. अंतिम अहवाल कदाचित एक किंवा दोन वर्षांनी येईल. त्यात या अपघाताचे खरे कारण कळू शकेल. या विमान अपघातात एकूण २७० लोकांचा मृत्यू झाला. यामध्ये २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्सचा समावेश होता. फक्त एक प्रवासी वाचला. १५ पानांच्या अहवालानुसार, टेक ऑफपासून अपघातापर्यंत संपूर्ण उड्डाण फक्त ३० सेकंद चालले. अहवालात बोईंग ७८७-८ विमान आणि इंजिनबाबत कोणत्याही ऑपरेटरला कोणताही इशारा किंवा कारवाई करण्याची शिफारस केलेली नाही. दोन्ही वैमानिक मुंबईचे होते आणि आदल्या दिवशी अहमदाबादला पोहोचले होते. उड्डाणापूर्वी त्यांनी पुरेशी विश्रांती घेतली होती.

# पत्रकारांसाठी कार्यशाळा लोकाभिमुख सेवांसाठी प्रशासन आणि माध्यमांचा समन्वय आवश्यक-विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

लोकाभिमुख सेवांसाठी प्रसार माध्यमे आणि प्रशासन यांच्यात समन्वय आवश्यक आहे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात माहिती जनसंपर्क महासंचालनाच्या छत्रपती संभाजी नगर जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, छत्रपती संभाजीनगर विभागाचे अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष डॉ.माधव सावरगावे, महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या पत्रकारिता विभाग प्रमुख डॉ.रेखा शेळके, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने,प्रमुख मार्गदर्शक दीपक रंगारी,जिल्हा सुचना विज्ञान केंद्राचे शेळके, प्रकल्प व्यवस्थापक शरद दिवेकर यांची उपस्थिती होती.

माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने या कार्यशाळेचे उदघाट्न नियोजन सभागृहात झाले. प्रथम मान्यवरांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.

विभागीय आयुक्त पापळकर म्हणाले की,बदललेल्या काळानुसार बातमीचे स्वरूप ही बदलले आहे. ज्याप्रमाणे वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दाखवल्या जाणाऱ्या बातम्या तसेच समाज माध्यमावर प्रदर्शित होणाऱ्या बातम्या यामधील फरक लक्षात घेता वृत्तपत्रातील बातम्यांमध्ये वस्तुस्थिती अधिक प्रमाणात मांडलेली दिसते. ही बाब कोणत्याही विषयाची पार्श्वभूमी समजण्यासाठी साह्यभूत ठरते. पत्रकार प्रशासनातील चुका निदर्शनास आणून देण्याचे काम करतात. बदललेले तंत्रज्ञान शासन लोकाभिमुख करण्यासाठी येणाऱ्या आवश्यक आहे. पत्रकारांनाही कायद्याचे ज्ञान, भाषेचा योग्य वापर या बद्दल ज्ञान आवश्यक आहे. समाजामध्ये सोहर्दपूर्ण वातावरण तयार करून संपर्क आणि संवादाच्या माध्यमातून प्रशासन आणि पत्रकारिता यांनी समन्वयाने काम केल्यास समाजाच्या विकासात गतिमानता येईल असेही पापळकर यांनी सांगितले.



माहिती जनसंपर्क महासंचालनाच्या छत्रपती संभाजी नगर जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, डॉ.माधव सावरगावे, डॉ.रेखा शेळके, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, आदी मान्यवरांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.

## पत्रकार समाजाला आरसा दाखवतात- जिल्हाधिकारी स्वामी

“जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, समाजाला आरसा दाखवण्याचे काम पत्रकार करतो. तंत्रज्ञानातील बदल गतिमानता आणि प्रगती यासोबत पत्रकाराने बदलत गेले पाहिजे. स्वतःला सर्व पद्धतीने अद्यावत ठेवण्यासाठी भाषा,शुद्धलेखन व संवाद पत्रकारांनी हाताळले पाहिजे. वाढलेल्या स्पर्धेमध्ये गुणवत्ता टिकवण्याचे हे एक मोठे आव्हान असून स्वतः साठी ही आचारसंहिता आवश्यक असते. त्याचे पालन पत्रकाराकडून होणे आवश्यक आहे. मराठी भाषेचे ज्ञान, प्रशासनातील नियम याचे अवलोकन पत्रकाराने करणे आवश्यक आहे. जेणेकरून वस्तुस्थिती मांडण्यामध्ये पत्रकारांना याचे सहाय्य होईल.

## जाणीव हरपू न देता वस्तूस्थिती मांडावी- डॉ.सावरगावे

“डॉ. माधव सावरगावे यांनी सांगितले की, पत्रकाराने जबाबदारीचे भान ठेवून पत्रकारिता करावी.स्वतः समाज व्यवस्थेतील आरसा म्हणून काम करत असताना प्रशासन व्यवस्था यांच्याविषयीच्याही जाणीव हरपू न देता वस्तुस्थिती आणि सत्य आधारित पत्रकारिता करावी. त्याचप्रमाणे प्रशासनाकडून पत्रकारांच्या अडचणी सोडवण्यामध्ये वेळोवेळी सहकार्य असावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

## सत्य वार्तांकन आवश्यक – डॉ.श्रीमती शेळके

“डॉ.रेखा शेळके म्हणाल्या की,मोबाईलमुळे वस्तुस्थिती विरहित माहितीचे प्रक्षेपण होतांना दिसते. पत्रकारांनी सत्य आधारित वार्तांकन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. मिलिंद दुसाने यांनी तर सूत्रसंचालन डॉ. प्रभू गोरे यांनी केले. या कार्यशाळेत अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी या विषयांवर जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयावर जिल्हा सुचना विज्ञान केंद्राचे शरद दिवेकर तर वृत्तसंकलन-संपादनात शुद्ध लेखनाचे महत्त्व या विषयावर प्रा. दीपक रंगारी, परभणी यांनी मार्गदर्शन केले.

## वरिष्ठ संपादकाची आगपाखड

**कार्यशाळेत पत्राकार सन्मान निधीसाठी अनेक वेळा कागदपत्रांची पूर्तता केली तरी माझे काम झाले नाही. प्रत्येक वेळी कागदपत्रांची मागणी करण्यात येते. पूर्तता केल्यानंतरही मात्र वरिष्ठ पातळीवर रद्द करण्यात येते. त्यावर ही आपल्याचा कार्यालयाचा शिक्का असतो. तरीही तो प्रस्ताव नामंजूर होतोच कसा काय? मग आपण कागदपत्र तपासणी करत नाही का? असा होतो. आपल्या कडून प्रस्ताव गेल्यावरही त्यात कमतरता राहतेच कसे काय? असा प्रश्न वरिष्ठ संपादकांनी केला. यावर मात्र त्यांना समाधानकारक उत्तर न मिळालयाने सभागृहात नाराज पसरली होती.**

# पत्रकारांसाठी कार्यशाळा तज्ज्ञांनी सांगितले कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्र आणि शुद्धलेखनाचे मंत्र

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

माहिती आणि म हासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजीत पत्रकारांसाठी कार्यशाळेत तज्ज्ञांनी पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्र आणि प्रमाणभाषा लेखनाच्या शुद्धलेखनाचे मंत्र सांगितले. तीन वेगवेगळ्या सत्रात तज्ज्ञांनी उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत तीन विविध विषयावर पत्रकारांना मार्गदर्शन करण्यात आले. उद्धाटन सत्रानंतर कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता या विषयावर जिल्हा सुचना विज्ञान केंद्राचे माहिती केंद्र माहिती व अधिकारी विद्याधर शेळके, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रकल्प व्यवस्थापक शरद दिवेकर यांनी केले. विविध कृत्रिम बुद्धिमत्ता ॲपचा वापर, त्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक त्यांनी दाखविले. त्यासोबतच सायबर सुरक्षा, भाषांतर, ऑडीओ रुपांतरण, ऑडीओ ते मजकूर रुपांतरण, फाईल निर्मिती, अहवाल विश्लेषण, आकडेवारी विश्लेषण, ग्राफिक्स, छायाचित्र, निवड भाषेचा योग्य वापर यासंदर्भातील माहिती व सादरीकरण शरद दिवेकर यांनी केले.

जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी शासनामार्फत माहिती जनसंपर्क विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध योजनांविषयी माहिती दिली. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी, अधिस्वीकृती पत्रिका याबाबत पात्रता, निकष, आवश्यक कागदपत्रे याविषयीची माहिती दिली. प्रा. दीपक रंगारी यांनी ‘मराठी भाषेचा पत्रकारितेमध्ये सुयोग्य वापर आणि प्रमाण लेखन’ याविषयी मार्गदर्शन केले. मराठी प्रमाणभाषेच्या शुद्धलेखनाचे नियम, शब्दाचा अर्थ, भाषेतील व्याकरणाचा वापर याबरोबरच मराठी भाषा समृद्ध करण्यात विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. वाक्यामध्ये येणारी क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व, दीर्घ,ईकारांत याबरोबरच एकाक्षरी क्रियापद, शब्दयोगी अव्यय, तत्सम आणि तद्भव शब्दांविषयीचे स्पष्टीकरण उदाहरणासह समजावून सांगितले. पत्रकाराने शब्दकोश आणि लेखनकोश याचा वापर करून निर्दोष लिखाण कसे असावे याविषयी मार्गदर्शन केले. विविध शब्दांच्या वाक्यानुसार आणि वेळेनुसार होणारा बदल उदाहरणासह सांगितला.

या कार्यशाळेसाठी आकाशवाणीचे वृत्तसंपादक समरजीत ठाकूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी संजय शिंदे, जिल्हा परिषदेतील जनसंपर्क विभागाचे संजय वाघ, सतीश औरंगाबादकर, आरोग्य विभागाच्या संवाद तज्ज्ञ विद्या सानप, पत्रकारांच्या संघटनांचे अध्यक्ष व सदस्य या कार्यशाळेत मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक पुण्यनगरी चे विजय बहादुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# छत्रपती संभाजीनगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सिमांकनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, क्षेत्रात भविष्यातील विकासाचे नियोजन करण्यासाठी सिमांकन करण्यात येत आहे. तसेच बांधकामाबाबत भविष्यात होणारी नागरिकांची फसवणूक व आर्थिक हानी टाळण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन व बांधकाम परवानगी घेऊनच बांधकामे करावीत तसेच संबंधित यंत्रणांना सिमांकनासाठी सहकार्य करावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, क्षेत्रात गेल्या आठवड्याभरापासून रस्त्यांच्या सिमांकनाची कार्यवाही संबंधित यंत्रणांकडून सुरु आहे, सदर सिमांकनांच्या कार्यवाहीबाबत नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

सद्यस्थितीत प्राधिकरण क्षेत्रातील प्रमुख रस्त्यांची शासन नियमात नमूद केलेल्या इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांचे सिमांकन करण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणा जसे की, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जागतिक बैंक, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर व इतर यंत्रणाकडून सुरु आहे.

शासनाने प्रत्येक रस्त्याच्या प्रकारानुसार इमारत रेषा व नियंत्रण रेषा रस्त्याच्या मध्यापासून किती अंतरावर असाव्यात या बाबतची नियमावली मंजूर केलेली आहे. सद्यस्थितीत अशा जागा हद्द फक्त नागरिकांना अवगत व्हावे म्हणून सिमांकीत करण्यात येत आहेत.

यंत्रणांच्या मालकीच्या जागेत रस्त्यात येणारी तात्पुरते पक्की बांधकामे अतिक्रम ीत समजण्यात येतील व तो संबंधित विभागाकडून निष्कासित करण्यास पात्र ठरतील. नियंत्रण इमारत रेषेच्या आतमध्ये येणारी व संबंधित विभागाकडून परवानगी न घेता केलेली बांधकामे ही अनधिकृत सम जण्यात येतोल, अशी अनधिकृत बांधकामे निर्मूलनाबाबत तूर्त कार्यवाही करण्यात येणार नाही. भविष्यातील विकासाचे नियोजन करण्यासाठी सिमांकन करण्यात येत आहे. तसेच बांधकामाबाबत भविष्यात होणारी नागरिकांची फसवणूक व आर्थिक हानी टाळण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन व बांधकाम परवानगी घेऊनच बांधकामे करावीत तसेच संबंधित यंत्रणांना सिमांकनासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल - घाटी रूग्णालय येथे जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**




सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्लास्टिक सर्जरी विभाग, प्लास्टिक सर्जरी असोसिएशन, IMA महाराष्ट्र IMA यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी भूषविले. प्रम ुख पाहुणे म्हणून बुलढाणा वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, महात्मा गांधी वैद्यकीय महाविद्यालयाचे उपाधिष्ठाता व सर्जरी विभागाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण सूर्यवंशी, महाराष्ट्र प्लास्टिक सर्जरी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. जितेन कुलकर्णी, उपाधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा, डॉ. गायत्री तडवळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

वैद्यकीय विद्यार्थी, प्लास्टिक सर्जन आणि विविध विभागप्रमुखांनी 'हितगुज' या चर्चासत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्लास्टिक सर्जरी विभागाच्या प्रमुख डॉ. उज्वला दहिफळे यांनी केले. त्या म्हणाल्या, 'प्लास्टिक सर्जरी म्हणजे केवळ चेहरा बदलणे किंवा भाजल्यावर त्वचा चिटकवणे नाही, तर ही एक प्रगत, वैज्ञानिक आणि कलात्मक शाखा आहे. 'प्लास्टिक' हा शब्द ग्रीक भाषेतील 'प्लास्टिकोस' या शब्दावरून घेतला असून, त्याचा अर्थ 'आकार देणे' असा होतो. भारतीय शास्त्रज्ञ सुश्रुत यांनी प्राचीन काळातच पुनर्निर्माण शस्त्रक्रियेचे वर्णन केले असून, आजची प्लास्टिक सर्जरी ही त्याच परंपरेचा आधुनिक विस्तार आहे.

तसेच, त्या म्हणाल्या, 'सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांची संख्या सतत वाढत असून, अधिष्ठाता डॉ. सुक्रे व डॉ. वैशाली उणे यांच्या मार्गदर्शनाखाली आमची टीम उत्कृष्ट सेवा देत आहे. घाटी हॉस्पिटलमधील मोफत औषधोपचारामुळे आमच्या शस्त्रक्रिया अधिक परिणामकारक होतात.'

डॉ. शिवाजी सुक्रे यांनी सर्व सुपर स्पेशालिटी डॉक्टर्सच्या कार्याची प्रशंसा केली व सांगितले की, 'कोणतीही गोष्ट रुग्णसेवेसाठी अपुरी पडू दिली जाणार नाही. वैद्यकीय महाविद्यालय आता मराठवाडा आणि खानदेशातील रुग्णांसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे; त्यामुळे पुणे-मुंबईला जाण्याची गरज उरलेली नाही.' डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी 'फादर ऑफ प्लास्टिक सर्जरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुश्रुत यांच्याविषयी माहिती दिली आणि अशा चर्चासत्रातूनच खरे वैद्यकीय विद्यार्थी घडतात, असे मत व्यक्त केले.

डॉ. जितेन कुलकर्णी यांनी विविध रुग्णांवर झालेल्या शस्त्रक्रियांचे ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरण करत विद्यार्थ्यांशी चर्चा केली. कार्यक्रमाच्या समारोपात डॉ. वैशाली उणे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस साजरा करण्यासाठी प्लास्टिक सर्जन्स डॉ. रमाकांत बेंबडे, डॉ. मंगेश तांदळे डॉ. राम चिलगर डॉ. अनुराधा पाटील डॉ. अमित पाटील डॉ. मयूर गोकलानी डॉ. आशिष कासट डॉ. चैतन्य पाटील डॉ. तायडे डॉ. सचिन जंगले डॉ. जाकीर मोमीन डॉ. व्यंकटेश कुलकर्णी डॉ. अभिजीत गजभरे डॉ. राजा, डॉ. गुरमीत सिंग यांनी सहकार्य केले

# पिंपळगाव येथील भारत माता मंदिर परिसरात आमदार प्रशांत बंब यांनी पित्यांसह वृक्षारोपण केले, निसर्गाशी एकरूप होण्याचे आवाहन




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद प्रतिनिधी गंगापूर तालुक्यातील दिवशी पिंपळगाव शिवारात मोठ्या प्रेमान्यावर वृक्षरोपण करण्यात आले विशेष म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्त 'एक पेड मां के नाम' हे अभियान अंतर्गत या उपक्रमाची सुरुवात गंगापूर तालुक्यातील विविध गावातून सुरुवात करण्यात आली आहे.

ज्याप्रमाणे आईला मुलाने कितीही त्रास दिला तर ती तोंडातू भ्र शब्दही काढत नाही; त्याचप्रमाणे आपण देखील कोणत्या ना कोणत्या कारणासाठी, घराच्या,मारतीच्या अडचणीसाठी मोठया प्रमाणात झाडांची कत्तल करतो. आणि झाडे देखील निम ूटपणे सहन करतात.परंतु आता प्रत्येकाने एक तरी झाड लावून ते जगवले पाहिजे व निसर्गाशी सर्वांनी एकरूप झाले पाहिजे असे आवाहन आमदार प्रशांत बंब यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्त 'एक पेड मां के नाम' हे अभियान अंतर्गत राबविण्यात येत असून गंगापूर तालुक्यातील दिवशी पिंपळगाव येथे भारतमाता मंदिर परिसरात (दि.१९) शनिवारी रोजी मोठ्या प्रमाणात ढोलताशांच्या गजरात, लेझीम खेळत वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मातोश्री कांचन बंब, वडील डॉ. बन्सीलला बंब, सरपंच मोहन बडोगे, धन्वंतरी डॉ. असोसिएशनचे डॉ. जीवन ताजी. डॉ. रणजीत गायकवाड, डॉ.गणेश जाधव,डॉ. जगताप डॉ.खरात व्यापारी सुरेश मुनोत, प्रीतम मुथा, लासुर टेशन येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शेषराव जाधव,गट शिक्षणाधिकारी कापसे,विस्ताराधिकारी सकदेव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.पुढे बोलताना आमदार प्रशांत बंब म्हणाले की, येत्या २२ जुलै रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्म दिवस असून यानिमित्ताने या उपक्रम गंगापूर व खुलताबाद तालुक्यात विविध समाजोपयोगी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले आहे. त्याच एक भाग म्हणून एक पेड मा के नाम या अभियानांतर्गत सुलतानाबाद,आरापूर, खडक नारळा, वैरागाड, म ाळीवाडगाव, पाचपीरवाडी आणि दिवशी पिंपळगाव या ठिकाणी १० हजार झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. त्यापैकी ९० टक्के झाडे जगवण्याचा मानस देखील त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा परिषद शाळा पिंपळगाव दिवशी तसेच सहकार अकॅडमीचे विद्यार्थी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होऊन ढोल ताशांच्या गजरात आमदार प्रशांत बंब यांनी लेझीम खेळत वृक्षांची मिरवणूक काढून भारत माता मंदिर परिसरामध्ये जवळ पास ५०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले विशेष म्हणजे या उपक्रम दि. ३० जुलै पर्यंत हे अभियान असेच सुरू राहणार असून हजारो वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याची माहिती भाजप तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली. दरम्यान यावेळी डॉ,असोसिएशनचे सदस्य,सहकार अकॅडमीचे शिंदे सर व विद्यार्थी,जिल्हा परिषद शाळा दिवशी पिंपळगाव येथील शिक्षक, विद्यार्थी भाजप युवा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, सुरेश जाधव, महेश गुजर,सदस्य इंद्रजीत जाधव, ज्ञानेश्वर वर्णे, सुजित वावरे, सुनील वावरे,बाळू वावरे, आकाश बडोगे, सुनील बोडके, सचिन बडोगे, राम बोडोगे, वैभव वरणे, संदीप शेलार,मीनाताई संजय पांडव, शिलाताई गाडे, कविता चव्हाण, आबासाहेब सरोवर, ज्ञानेश्वर आहेर, ज्ञानेश्वर निकम, अंबरसिंग जंघाळे, शरद नायमाने, सुनील जोनवाल, गणेश देशमुख, शिवनाथ मालकर, गुजर सर, रवि राठोड, मदन सुंदरडे, कृष्णा कीर्तिकर, मच्छिंद्र कीर्तिकर, गणेश देशमुख, भगवान बनकर, गणेश कुकलारे, गणेश चव्हाण, तुळशीराम झळके, श्रीहरी मांडवगड, गोरख लांडगे, निखिल चव्हाण, गणेश लांडगे, यांच्यासह मोठ्या प्रमाणात परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# खाजगी प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ द्या - संघटनेची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य खाजगी प्राथमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेच्या वतीने राज्यातील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांमधील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ मिळावा, यासाठी राज्य सरकारकडे सविनय निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन संघटनेचे राज्याध्यक्ष मा. श्री. प्रकाश सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री मा. एकनाथराव शिंदे व शिक्षणमंत्री मा. दादासाहेब भुसे यांना देण्यात आले.

या निवेदनात प्राथमिक मुख्याध्यापकांनाही माध्यमिक शाळांप्रमाणे अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ द्यावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. माध्यमिक शाळांमध्ये हा लाभ पूर्वीपासूनच लागू असून, प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापकांना मात्र यापासून वंचित ठेवले गेले आहे. या अन्यायकारक स्थितीवर उपाय म्हणून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संघटनेने यावेळी असेही स्पष्ट केले की, शाळेतील मुख्याध्यापक हे शैक्षणिक व प्रशासकीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असतात. त्यामुळे त्यांना देखील हक्काचे लाभ देणे आवश्यक आहे. पूर्वी हा लाभ काही अंशी दिला जात होता, मात्र सध्या तो बंद करण्यात आल्याने अनेक मुख्याध्यापक आर्थिक अडचणीत आले आहेत. अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देण्यात आल्यास मुख्याध्यापकांचा मनोबल वाढेल व शिक्षण व्यवस्थाही अधिक सक्षम बनेल.

या निवेदनावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, लवकरच यासंबंधी निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यामुळे संघटनेच्या मागणीकडे शासन गांभीर्याने पाहत असून, लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे.

मुख्याध्यापक संघटनेच्या या प्रयत्नाचे अनेक स्तरातून कौतुक होत असून, खाजगी प्राथमिक शिक्षण क्षेत्रासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

# श्री घृष्णेश्वर देवस्थान समितीच्या अध्यक्षपदावर कुणाल दांडगे यांची निवड

**खुलताबाद/छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरुळ येथील बारावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री घृष्णेश्वर देवस्थानच्या विश्वस्त समितीची विशेष बैठक १५ जुलै रोजी मंगळवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास देवस्थान ट्रस्ट कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विद्यमान अध्यक्ष योगेश टोपरे यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर नवीन अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडली.



यावेळी सर्वानुमते कुणाल उर्फ विकी दांडगे यांची अध्यक्षपदी, तर योगेश टोपरे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर दांडगे यांच्या समर्थकांनी गुलाल उधळून व फटाके फोडून मंदिर परिसरात उत्साहात आनंदोत्सव साजरा केला. या बैठकीस देवस्थानचे विश्वस्त संजय वैद्य, मिलिंद शेवाळे, राजेंद्र कोशीके, योगेश टोपरे यांचे सह विश्वस्त मंडळी उपस्थित होती. विशेष म्हणजे कुणाल दांडगे देवस्थानाचे अध्यक्षपदी निवड झाल्याने दुकानदार संघटनाच्या वतीने शालू श्रीफळ देऊन त्यांचे सत्कार केले.

यावेळी माजी उपसभापती विजय भालेराव विलास नाडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे महिला जिल्हा उपाध्यक्ष अनिता बोरसे तसेच एकलव्य संघटनेचे जिल्हा युवा कार्याध्यक्ष हितेश ठाकरे, अनिल आव्हाड, ज्ञानेश्वर घाडगे, मोहम्मद शहा, ज्ञानेश्वर भालेराव, सुरेश बोरसे सुनील लोखंडे, राजू शेठ, सुनील लोखंडे, संजय आव्हाड. गणेश काकडे यांचे सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. नवीन अध्यक्षपदी निवडीनंतर कुणाल दांडगे यांनी तात्काळ श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरातील सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. मंदिरात येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने लावण्यात आलेल्या ब्रेकेटिंगची पाहणी त्यांनी केली. या पाहणी वेळी त्यांच्या सोबत विश्वस्त मिलिंद शेवाळे, राजेंद्र कौशिके, संजय वैद्य आदी उपस्थित होते. विशेष म्हणजे, श्री घृष्णेश्वर देवस्थान ट्रस्टच्या स्थापनेपासून प्रथमच भोलेनाथाची सेवा करणाऱ्या पुजाऱ्याची अध्यक्षपदी निवड झाल्याने, पुजारी परिवारात विशेष आनंद व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

**नवीन अध्यक्ष तसेच कार्यकारिणी दलालांचा हैदोस रोखणार का? 'अट्टल मत'चा अध्यक्षांना रोखठोख सवाल?**

श्री घृष्णेश्वर देवस्थान येथे अनेक वर्षापासून आपण पाहत आलो आहेत की, येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना थेट दर्शनाच्या नावाखाली पैशांची लूट करून फसवले जाते. यावर अनेकदा अट्टल मत ने आवाज उठवला. परंतु कुभकर्णी झोपेत असलेली समिती मात्र बघ्याचे सोंग घेते. आता नवीन अध्यक्ष आले आहे. दांडगे साहेब यांनी तरी यावर रोख लावावी अशी अपेक्षा 'अट्टल मत'ची आहे. छत्रपती संभाजीनगर येथील 'अट्टल मत'च्या टीमने दर्शनाच्या दलालीवर धडाकेबाज लिखाण केले होते. यावर त्यांना धमकीचे फोन यापूर्वी आले होते. परंतु अशा भिकार धमक्यांना न घाबरता बिनधास्तपणे त्यांचा चेहरा चव्हाट्यावर आणला होता. निव्वळ फसवणूक केली जाते. कर्मचाऱ्यांची अरेरावी देखील पाहण्यास मिळते. यावर अध्यक्ष दांडगे किती खरे उतरतात हे पाहण्यासारखे आहे.

# दि.२७ जुलै नामांतर ठराव दिनी पँथरचा भव्य संघर्ष मेळावा !!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

दि.२७ जुलै २०२५ वेळ: सकाळी ११.०० वा. स्थळ: कॉ. व्ही. डी. देशपांडे हॉल, एन ७ सिडको, छ. संभाजीनगर येथे नामांतर ठराव दिनी पँथरचा भव्य संघर्ष मेळावा होणार आहे. यात प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ. ऋषीकेश कांबळे विद्रोही साहित्यिक, कवी, समिक्षक, विचारवंत, प्रमुख पाहुणे ग.ह. राठोड आंबेडकरी साहित्यीक, विचारवंत, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. रमेशभाई खंडागळे पँथर नेते, भारतीय दलित पँथर, महाराष्ट्र हे राहणार आहेत.

भारतीय दलित पँथरची बैठक पँथरचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. रमेशभाई खंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली होऊन या बैठकीमध्ये अत्यंत महत्वपूर्ण निर्णय म्हणजे २७ जुलै २०२५ ला पँथरचा संघर्ष मेळावा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. याचे ऐतिहासिक कारण असे की पँथरने मोर्चे, निदर्शने आणि सत्याग्रह या मार्गाने आंदोलन करून महाराष्ट्र शासनाकडे मराठवाडा विद्यापिठास डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे नांव देण्यात यावे ही मागणी केली व त्यावेळचे मुख्यमंत्री मा.ना.शरद पवार यानी २७ जुलै १९७८ रोजी मराठवाडा विद्यापिठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव देण्याचा ठराव दोन्ही सभागृहात एक मताने पास केला, हा आपल्या संघर्षाचा व एकतेचा विजय होता. परंतु नंतर मात्र जातीयवादी शक्तींनी उच्छाद मांडला व खुन, जाळपोळ आणि गोरगरीबांना वेठीस धरून सरकारला ठराव अमलात आणू दिला नाही.

पुढे हा नामांतर संघर्ष १९९४ पर्यंत चालला व शेवटी शरद पवार यांनीच १४ जानेवारी १९९४ रोजी डॉ. बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापिठ या नावाने ठराव पास करुन त्याची अंमलबजावणी केली. शेवटी संघर्ष यशस्वी ठरला. म्हणून २७ जुलैला संघर्ष दिन म्हणून साजरा करण्यात येतो. व यावर्षीसुध्दा हा संघर्ष दिन साजरा करण्यात येणार आहे व संघर्ष यापुढेही करावा लागणार आहे. कारण आज समाजाला शिक्षणापासून दूर ठेवण्याची कुटनिती आखली जात आहे, शिष्यवृत्ती बंद केल्यासारखीच आहे. राखीव जागा भरल्या जात नाहीत. त्याचप्रमाणे ज्या सरकारी जमीनीवर अतिक्रमण केले आहे. त्या जमीनी नावावर केल्या जात नाहीत. उलट जमीनी हिसकावून घेण्याचे षड्यंत्र राबवल्या जाते आहे.

रोजगार नाही, महागाई प्रचंड वाढली आहे, बँका कर्ज देत नाहीत असे एक नव्हे अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. गोरगरीबांच्या झोपड्या घरे पोलीस बळावर उठविल्या जात असून श्रीमंताचे महाल उभे केले जात आहेत. गोरगरीबांच्या गायरान जमीनीवरील अतिक्रमण पोलीस आणि जातीयवादी गुंड व सरकार काढून टाकत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिलेल्या संविधानाला बदलण्याचे आणि मानव मुक्तीच्या सुरक्षीत व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे काम सत्ताधारी पक्ष संघटना करतांना दिसत आहे. हे जर थांबवायचे असेल तर दलित, आदीवासी, ओबीसी, बहुजनांनी एकत्र येऊन आपली संघटीत शक्ती निर्माण करुन हा संघर्ष उभा करणे हेच यावर एक उत्तर आहे.

तेव्हा चला, उठा व एक व्हा! आणि बाबासाहेबांचा संघर्ष उभा करा हेच पँथरचे आवाहन आहे. त्याची सुरुवात २७ जुलै २०२५ रोजी होणाऱ्या पँथर संघर्ष मेळाव्यात हजारोंच्या संख्येने सामील व्हा व भीमशक्तीचे विराट दर्शन घडवा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

# ज्ञान संदीप विद्यालय मिसरवाडी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी कांदबरी वाचन सोहळा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मिसरवाडी येथे आज दि.१८ जुलै २०२५ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या पोवाडे, कथा, कादंबऱ्या आणि गोष्टींचे वाचन करून त्यांना आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सहसचिव माननीय संदीप सोनवणे सर, तर अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. अभिजीत सोनवणे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील सहशिक्षक श्री. अजयकुमार खिल्लारी सर यांनी केले. खिल्लारे सरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर अभ्यासपूर्ण प्रस्तावना सादर केली.

शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी मंचावर येऊन आपल्या मनोगताद्वारे अण्णाभाऊंच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाविषयी मार्गदर्शन केलं.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माध्यमिक सहशिक्षक श्री. किरणकुमार सोनवणे सरांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती .वैशाली बोरुडे , श्री. आनंद सातदिवे, श्री. विजय आघाव, श्री. नय्युम शेख, श्री. स्वामी जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी एक तास वाचन करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना शब्दस्मरणाने अभिवादन केले.

# मुनिश्री प्रभाव सागरजी महाराज यांचा उपस्थितीत एन ९ अहिंसा मार्ग सिडको येथे चातुर्मास कलश स्थापना आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री १००८ कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाळ दिगंबर जैन मंदिर एन ९अहिंसा मार्ग सिडको येथे आचार्य पवित्र सागर महाराजांचे परम प्रभावक शिष्य मुनिश्री प्रभाव सागरजी महाराज यांचा चातुर्मास होत आहे चातुर्मास कलश स्थापना दिनांक २०/७/२०२५ रविवार रोजी प्रतीष्ठाचार्य राजेश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माननीय श्री जितेंद्रजी पापळकर विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर प्रमुख अतिथी मा.नामदार श्री अतुल जी सावे,मा.आमदार संजयजी केणेकर, मा.श्रीफुलचंदजी जैन उद्योजक रवी मसाले यांची उपस्थिती राहणार आहे तसेच श्री रविंद्रजी नारळे, श्री नितेशजी भंडारे, श्री रविंद्रजी कोंडेकर, श्री सुकुमारजी समजगे,श्री अमितजी गुंगे, श्री राजेन्द्रजी अवतारे, श्री संतोषजी सोनटक्के, श्री नितीनजी चित्ते यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी ठिक १०-३० वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे या साठी विविध ठिकाणच्या गुरू भक्ताची उपस्थिती राहणार आहे परम पुज्य मुनिश्री प्रभावसागर जी महाराज यांचे चातुर्मास निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन चातुर्मास समिती अध्यक्ष म्हणून श्री अमोल मोगले कार्याध्यक्ष म्हणून श्री अजित गोसावी यांची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच विश्वस्त श्री वर्धमान जी वायकोस,प्रकाश भाकरे, दिपक डिकेकर, निलेश सावळकर, रविंद्र सांगोले,शेखर वायकोस, बाहुबली धोंगडे, राजकुमार कुरकुटे यांच्यावर विशेष जबाबदारी देण्यात आली आहे त्यासह विविध समीत्यावर सौ पल्लवी वायकोस सौ.अर्चना मोगले, सौ



.वैशाली सांगोले, सौ.पुनम अन्नदाते, सौ. सीमा वायकोस, सौ. अश्विनी वायकोस, सौ. संजिवनी बाळशेटे,सौ.लता अन्नदाते, सौ.भारती भाकरे,सौ.लता महाजन, सौ.शैलजा सांगोले, सौ. दिपा दलाल, सौ. सारिका दलाल, सौ.प्रतिभा सावळकर, सौ. सारिका डिकेकर, श्री दिगंबर क्षीरसागर, श्री प्रवीण गोसावी, श्री संजयजी महाजन, श्री राजकुमार वायकोस, श्री दिलीप ऐखंडे, श्री दगडुजी वायकोस, श्री जीवंधर कोरडे, श्री अशोक वायकोस, श्री दिपक वायकोस, श्री दिगंबर वायकोस श्री राहुलजी जोगी, श्री राजकुमार लिंगायत, श्री संदिप एस वायकोस, श्री सतीष जोगी, श्री दिलीप संगवे, श्री प्रशांत संघई, श्री स्वप्नील अन्नदाते, सौ मीनाताई साहुजी,सौ मिनाक्षी उदगीरकर, सौ आशा दलाल, सौ शुभांगी ऐखंडे, सौ अरुणा संगवे,सौ.संगीता बाळशेटे , सौ.विद्या अन्नदाते, सौ.मंदा वायकोस,सौ मंगला क्षीरसागर, सौ.दर्शना संघवी, सौ छाया वाटपाडे, सौ जयश्री हुडवेकर, सौ. शुभांगी इंगलवार, सौ.मंजु सिंगलकर, सौ विद्या मेहेत्रे, सौ प्रविणा अन्नदाते, सौ मीना आहेरकर, श्री अनील बुर्से, बाहुबली बोपलकर, प्रकाश धुमाळ यांची नियुक्ती करण्यात आली असुन सर्व कार्यकर्ते यशस्वीतेसाठी प्रयत्न शील आहेत, प्रगती महिला मंडळ अध्यक्षा सौ सविता गोसावी यांच्यासह मयुर पार्क येथील महिला मंडळ, पीसा देवी येथील स्वस्ति महिला मंडळ सहकार्य करीत आहे या कार्यक्रमाला विविध स्तरातील मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले आहे तसेच समस्त सनातन दिगंबर जैन समाजाचे वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या कार्यक्रमाला समस्त दिगंबर जैन बंधु भगिनी श्रावक श्रावीका युवक युवती सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान विश्वस्त मंडळ अध्यक्ष तथा चातुर्मास समिती अध्यक्ष अमोल मोगले कार्याध्यक्ष अजित गोसावी तथा मुख्य मार्गदर्शक विलास जोगी यांनी केले आहे

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबंधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199

# मराठा एसईबीसी आरक्षण घटना दुरुस्ती शिवाय कसे देणार ? जेष्ठ विधीज्ञ गोपाल शंकर नारायण

## मराठा आरक्षण ५०टक्के पुढे; आरक्षणविरोधी याचिकाकर्त्यांचा प्रश्न

**मुंबई (अटुल मत प्रतिनिधी)**

वर्षानुवर्षे पुरोगामी राहिलेला मराठा समाज अचानक मागास कसा झाला ? मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरक्षण कसे देणार असे एक ना अनेक प्रश्न या सुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात येऊन ५०टक्के पुढील स्वतंत्र १० टक्के आरक्षणा देण्याचा घाट का घालण्यात येत आहे ?असे काही एक करण्याचा घटनात्मक अधिकार राज्य शासनाला नाही असे प्रश्न मराठा आरक्षणविरोधी याचिकाकर्त्यां तर्फे शनिवारी उच्च न्यायालया च्या विशेष पूर्णपीठा पुढील सुनावणीच्या वेळी उपस्थित करण्यात आले, तर आरक्षणाचा सर्वाधिक फटका हा खुल्या प्रवर्गाला बसत असल्याची टिप्पणी न्यायालयाने केली.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष खंडपीठापुढे मराठा आरक्षणाच्या अंतिम सुनावणीला शुक्रवारपासून सुरूवात झाली. या प्रकरणी शनिवारी दिवसभर सुनावणी झाली. त्यावेळी, वरिष्ठ वकील अरविंद दातार आणि गोपाळ शंकरनारायण,पी एम संचेती, यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्ति वाद केला.

सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा घालून दिलेली असतानाही मराठा समाजाला सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या मागास ठरवून म हाराष्ट्र शासन ५०%आरक्षण मर्यादांचे सातत्याने उल्लंघन करत असुन महाराष्ट्र शासनाचा आरक्षण देण्याचा निर्णय घटनात्मक तरतुदींचा उल्लंघन ठरत आहे असा युक्तिवाद अरविंद दातार यांनी केला. राज्य सरकारने यापूर्वीही मराठा समाजाला ही मर्यादा ओलांडून आरक्षण देण्याचा प्रयत्न केला.मात्र सर्वोच्च न्यायालयाने तो फेटाळला, असेही वकील अरविंद दातार यांनी न्यायालयाला सांगितले.



एकाच समाजाला स्वतंत्र आणि तेही दहा टक्के आरक्षण का देण्यात येत आहे ? असे प्रश्न शंकरनारायण यांनी युक्तिवाद करताना उपस्थित केले.

राज्याने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली नसेल आणि एखाद्या समाजाला आरक्षण द्यायचे असल्यास केंद्रीय मागासवर्ग आयोगाची संमतीची आवश्यकता भासत नाही. तथापि, राज्य सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देऊन ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. त्यामुळे राज्य सरकारला केंद्रीय आयोगाची संमती घेणे आवश्यक असल्याचा युक्तिवादही शंकरनारायण यांनी केला.

राजकीय क्षेत्रात मराठा समाज नेहमीच अग्रणी राहिला आहे. ब्रिटीशकाळापासून २०१३ पर्यंत मराठा समाज मागासअसल्याचे कोणत्याही मागासवर्ग आयोगाने म्हटलेले नाही. तथापि, त्यानंतर मात्र हा समाज अचानक मागास असल्याचे सांगण्यात येऊ लागले. निवृत्त न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड मागासवर्ग आयोगाने सर्वप्रथम, मराठा समाज सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असून हा समाज मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकला गेल्याचा अहवाल सादर करून या समाजाला सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाची शिफारस केली ही अचानक बदलेली परिस्थिती न उलगडणारी आहे, असेही शंकरनारायण यांनी मराठा आरक्षणाला विरोध करताना न्यायालयाला सांगितले.

त्याचवेळी, सद्यस्थितीला सनदी अधिकारी, आयपीएस अधिकारी किंवा मंत्रालयातील अधिकारी हे मराठा समाजाचे असल्याचा दावाही त्यांनी केला. ही स्थिती असतानाही या समाजाला मागास ठरवून आरक्षण देण्याचा घाट घातला जात असल्याचे शंकरनारायण यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.

मराठा आरक्षणा संदर्भातील अंतिम सुनावणीला मुंबई उच्च न्यायालयात सुरुवात झाली असुन १८ जुलैच्या सुनावणीत मराठा समाज मागास नाही? हे सिद्ध करण्याकरता पुरावे सादर करण्याचे विरोधी याचिका कर्त्यांना निर्देश दिले.या प्रकरणी येत्या सोमवारी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एकदा सरन्यायाधीशां पुढे सुनावणी होणं अपेक्षित आहे.न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती संदिप मारणे आणि न्यायमूर्ती एन जे जमादार यांच्या पूर्णपीठा समोर ही सुनावणी सुरू आहे.

या विशेष न्यायालयात न्यायालयात याचिकाकर्ते भाऊसाहेब भुजंगराव पवार, अॅड जयश्री लक्ष्मण पाटील,सीमा श्रीगोपाल मांधा,संजित राममिलन शुक्ला,प्रथमेश उदय ढोपले आणि इतर व्यक्तींनी महाराष्ट्र शासन व राज्य सचिव सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग. यांचे विरोधात जनहित याचिका,याचिका दाखल केलेली असुन हस्तक्षेप याचिकाकर्ता म्हणुन म राठा समाजाच्या वतीने आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील हे मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता असुन त्यांचे वतीने अॅड श्रेयश संजीव देशपांडे व अॅड मधुर अनिल गोलेगावकर हे कामकाज पहात आहेत.

दरम्यान, गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीच्या वेळी याचिका प्रलंबित असेपर्यंत शैक्षणिक प्रवेश आणि सरकारी नोकऱ्यां तील नियुक्त्यां बाबत उच्च न्यायालयाने अंतरिम दिलासा दिल्याची बाब निदर्शनास आणून दिली गेली नाही. परंतु,आधीच्या सुनावणी च्या वेळी दिलेला दिलासा हा २०२४-२५ या शैक्षणिक प्रवेशा पुरता कायम होता. यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे काय ? असा प्रश्न आरक्षणाला विरोध करणाऱ्यांनी उपस्थित करून सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती हे पूर्ण पीठाला सांगण्यात आले.

तथापि, आधीच्या सुनावणीच्या वेळी अंतरिम दिलासा देण्या बाबत सविस्तर सुनावणी झाली होती. कोणीतरी नव्याने याचिका करते आणि अंतरिम दिलासा देण्याची मागणी करते हे सत्र सुरूच राहणार आणि मूळ प्रकरण अंतिमत: ऐकले जाणार नाही, असे राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी पूर्णपीठाला कालच्या सुनावणीत सांगितले होते.

या प्रकरणी येत्या सोमवारी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एकदा सर न्यायाधीशा पुढे सुनावणी होणं अपेक्षित आहे. त्यामुळं तूर्तास उच्चन्यायालयात ही सुनावणी घ्यायला नको, अशी मागणी आरक्षणाला विरोध करणाऱ्या डॉ. गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात केली होती, मात्र यावर इतरांनी आक्षेप घेताच न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांनी अंतिम सुनावणीला सुरूवात करू.

सर्वोच्च न्यायालयाला जर वाटलं तर ते नव्यानं निर्देश जारी करतील, असं स्पष्ट करण्यात आलं. त्यानंतर जेष्ठ वकील पी एम संचेती यांनी आपल्या युक्तिवादास सुरूवात केली होती. त्यांचा प्राथमिक युक्तिवाद ऐकल्यानंतर यासंदर्भातील दोन अहवालात काय फरक आहे?, मराठा समाज मागास कसा नाही? हे आम्हाला पटवून द्या, अशी भूमिका उच्च न्यायालयानं घेतली आहे. दरम्यान, या प्रकरणी पुढील सुनावणी २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.

---

# वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळासाठी २०० कोटींच्या भांडवलाची मागणी - आमदार श्वेता महाले पाटील

**मुंबई (अटुल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील राजपूत समाज हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असा समाज आहे. मराठा समाजात एकरूप होऊनही या समाजाने आपली स्वतंत्र ओळख आणि गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. या समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी आणि विशेषतः युवक-युवतींना शिक्षण व व्यवसायात पाठबळ देण्यासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.

या महामंडळाला सध्या ५० कोटी रुपये भांडवल म्हणून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मात्र, ही रक्कम अपुरी असून, ती वाढवून २०० कोटी रुपये करण्याची आग्रही मागणी चिखली विधानसभा म तदारसंघाच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी विधिमंडळात केली आहे.

राजपुत समाजातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी आ. सौ. श्वेता महाले यांनी जुलै २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता.




त्यानंतर त्यांनी सातत्याने या म हामंडळाच्या स्थापनेसाठी पाठपुरावा करत वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापनेस २३ सप्टेंबर २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळवून दिलेली आहे. राजपूत समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील युवक, युवतींना शैक्षणिक तसेच व्यवसायासाठी आर्थिक साहाय्य करण्यासाठी हे महामंडळ घोषित केलेले आहे.

या महामंडळास ५० कोटींचे आर्थिक भाग भांडवल देण्यात येणार असल्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

परंतु राजपूत समाज हा महाराष्ट्रभर मोठ्या संख्येने आहे आणि खूप मोठ्या प्रमाणात युवक, युवती बेरोजगार आहेत, म्हणूनच ५० कोटींचे आर्थिक भाग-भांडवल २०० कोटी करण्यात यावे आणि राजपुत समाजातील युवक, युवतींना न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी आज औचित्याच्या मुद्द्याद्वारे आ. सौ. श्वेता महाले यांनी विधिमंडळात केली.

---

# वृक्ष लागवड करणाऱ्या पाच सरपंच व शिक्षकांना आमंत्रित करून त्यांचा वाढदिवस सेवा गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले



**छत्रपती संभाजीनगर (अटुल मत प्रतिनिधी)**

शिवराणा सेवा संघ वतीने काल रात्री आठ वाजता शिवराणा वाचनालय पुंडलिकनगर येथे सात वाजता गावं खेड्यात कार्यरत सरपंच चा नियोजन करून ज्यांनी वृक्ष लागवड करून जबाबदारी मानसाला आवश्यक ऑक्सिजन वृक्ष देतात तसेच फळ देणारे तसेच फळं देतात निसर्ग सौंदर्य संतोलन पर्यावरण पुरक दिन जे व्यक्ती वृक्ष लागवड करून वाढदिवस साजरा करत आहे त्यांचा अनोखा वाढदिवस साजरा करत शिवराणा सेवा संघ व नागरी विकास सेवाभावीसंस्था वतीने सेवा सन्मान पुरस्कार शुरविर महाराणा प्रतापसिंह महापुरुषांच्या प्रेरणा घेतली जावी म्हणून हा सन्मान सरपंच व शिक्षकांना बोलवून शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह १)लक्ष्मण महेर सरपंच राजेवाडी, २) भरत महेर मा.सरपंच, ३) धनपाल खोकड मुख्याध्यापक, ४) मा.राजू शिहरे शिक्षक जालना, ५) कल्याण शिंदे शिक्षक गजानन नगर पांच लोकांना हा वाढदिवसाच्या निमित्ताने वृक्ष लागवड करून जबाबदारी मानसाला आवश्यक आहे मानवतावादी विचार करणारे मंडळीला अनोखा सन्मानित करण्यात आले सुत्रसंचलन एल डी ताटू,तर प्रस्तावना भाऊसिंग बैनाडे, अध्यक्ष भाषण भरत घुनावत काका यांनी केलं. जे पदाधिकारी संयोजक एल डी ताटू, भावसिंग बैनाडे, भरत घुनावत, काळुराम सिंगल, आनंद बारवाल, नारायण उटाडे, नारायण महेर, दुर्गासिंग महेर, दिनेश बलरावत, बाबुलाल महेर, विजय महेर, गोवर्धन शेवगण, जितेंद्र निकुंभ, शिवसिंग खोकड, गणेश राजपूत, चंदनसिंग काहटे, जादुसिंग महेर, संजय मेवाळ, प्रविण राजपूत अजबसिंग शिहरे, विजय लोधवाल आदी.

# समुद्रातील पाण्यातून मीठ, खारटपण व क्षार काढून पिण्या योग्य व सिंचना साठीची प्रक्रिया (डिसॅलिनेशन) शाश्वत विकास करेल - राजेंद्र दाते पाटील

## राज्य शासनाने परिश्रम घ्यावेत

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

समुद्रातील खारटपणा काढण्याची प्रक्रिया‘ किंवा ‘पाण्याचे निर्लवणीकरण‘ म्हणजे ’डिसॅलिनेशन’.असुन समुद्रातील पाण्यातून मीठ,खारट व क्षार काढून ते पाणी पिण्यायोग्य किंवा सिंचनासाठी योग्य बनवण्याची प्रक्रिया (डिसॅलिनेशन) शाश्वत विकास करेल असे प्रतिपादन जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले. या साठी महाराष्ट्र शासनाने प्रचंड परिश्रम घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार व पारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांना सर्व कस पणाला लावावा लागेल असे प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव व जेष्ठ जलतज्ञ डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी आमच्या प्रतिनिधी सोबत विशेष बातचीत करताना या अत्यंत क्लिष्ट व अभ्यासु बाबी नमुद केल्या.

पुढे अधिकची सविस्तर माहिती देताना ते म्हणाले की, डिसॅलिनेशन म्हणजे समुद्रातील किंवा खारट पाण्यातून मीठ आणि इतर क्षार काढून ते पाणी पिण्यायोग्य किंवा सिंचनासाठी योग्य बनवण्याची प्रक्रिया आहे. मराठीत या प्रक्रियेला ‘समुद्रातील खारटपणा काढण्याची प्रक्रिया’ किंवा ‘पाण्याचे निर्लवणीकरण’ (डिसॅलिनेशन) असे म्हणतात. यात सम ुद्राच्या पाण्याचे शुद्धीकरण केले जाते, ज्यामुळे ते पिण्यासाठी आणि शेतीसाठी वापरले जाऊ शकते.

सध्या रशियन शास्त्रज्ञ उच्च- तापमान, कमी-शक्तीचे थोरियम अणुभट्ट्या विकसित करत आहेत, ज्यामध्ये वीज आणि उष्णता निर्माण करण्यासाठी थोरियम आणि शस्त्रास्त्र- दर्जाच्या प्लुटोनियमचे मिश्रण वापरण्याची शक्यता आहे. या अणुभट्ट्या हायड्रोजन उत्पादन आणि पाण्याचे निर्लवणीकरण (डिसॅलिनेशन) करण्यासाठी देखील वापरल्या जाऊ शकतात. हा प्रकल्प सोव्हिएत काळातील संचित प्लुटोनियम वर आधारित आहे, जो साठवणे आणि पुनर्प्रक्रिया करणे महाग आहे.

**थोरियम आणि प्लुटोनियम**

अणुभट्ट्या थोरियम आणि शस्त्रास्त्र- दर्जाच्या प्लुटोनियमचे मिश्रण वापरतात,ज्यामध्ये प्लुटोनियम अणु अभिक्रिया सुरू करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी विखंडन पदार्थ म्हणून काम करते.

**उच्च-तापमान, कमी-शक्ती:**

हे अणुभट्ट्या उच्च-तापमान आणि कमी- शक्तीच्या बनवण्या साठी डिझाइन केल्या जात आहेत,ज्यामुळे ते वीज निर्मितीच्या पलीकडे विविध अनुप्रयोगांसाठी योग्य बनतात.

**पाण्यावर स्वतंत्र शीतकरण:**

पारंपारिक अणुभट्ट्यांप्रमाणे, हे थोरियम अणुभट्ट्या शीतलक म्हणून हेलियम, कार्बन डायऑक्साइड किंवा हायड्रोजन वापरू शकतात, ज्यामुळे नद्या किंवा इतर स्रोतांमधून पाण्याची गरज कमी होते.

**कचरा कमी करणे :**

थोरियम-आधारित अणुभट्ट्यां मधून युरेनियम-आधारित अणुभट्ट्यांच्या तुलनेत कमी काळ टिकणारा किरणोत्सर्गी कचरा निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**हायड्रोजन उत्पादन आणि निर्लवणीकरण(डिसॅलिनेशन)**

या अणुभट्ट्यांद्वारे निर्माण होणारी औष्णिक ऊर्जा हायड्रोजन उत्पादन आणि समुद्राच्या पाण्याचे डिसॅलिनेशन करण्यासाठी वापरली जाऊ शकते, ज्यामुळे ऊर्जा आणि जल सुरक्षेसाठी संभाव्य उपाय उपलब्ध होतात.

**पुनर्प्रक्रिया आणि पुनर्वापर:**


सध्याच्या पुनर्प्रक्रिया तंत्रज्ञानामुळे अजूनही प्लुटोनियम असलेले किरणोत्सर्गी कचरा निर्माण होतो,परंतु थोरियमचा वापर अधिक कार्यक्षम इंधन पुनर्वापराची क्षमता प्रदान करतो.





**बार्सिलोना, स्पेनमधील रिव्हर्स ऑस्मोसिस डिसेलिनेशन प्लांट**

त्याच्या ऊर्जेच्या वापरामुळे, समुद्राच्या पाण्याचे क्षारीकरण करणे हे पृष्ठभागावरील किंवा भूजलातील गोड्या पाण्यापेक्षा , पाण्याचे पुनर्वापर आणि जलसंवर्धनापेक्षा सामान्यतः जास्त महाग असते ;तथापि, हे पर्याय नेहमीच उपलब्ध नसतात आणि साठ्यातील घट ही जग भरातील एक गंभीर समस्या आहे. क्षारीकरण प्रक्रियांमध्ये थर्मल पद्धती ( डिस्टिलेशनच्या बाबतीत ) किंवा मेम्ब्रेन- आधारित पद्धती (उदा. रिव्हर्स ऑस्मोसिसच्या बाबतीत ) वापरल्या जातात.




२०१८ मध्ये झालेल्या एका अंदाजानुसार, ‘२५०हून अधिक देशांमध्ये १८,४२६ डिसॅलिनेशन प्लांट कार्यरत आहेत. ते दररोज ८७ दशलक्ष घनमीटर स्वच्छ पाणी तयार करतात आणि ३०० दशलक्षा हून अधिक लोकांना पाणी पुरवतात.‘ २४ऊर्जेची तीव्रता सुधारली आहे: ती आता सुमारे ३ के डब्ल्यू एच/मी३आहे (२०१८ मध्ये), १९७० मध्ये २०-३० डब्ल्यू एच/मी३पेक्षा १०पट कमी.२४ तरी सुद्धा २०१६ मध्ये पाणी क्षेत्राद्वारे वापरल्या जाणाऱ्या उर्जेच्या सुमारे २५% डिसॅलिनेशन होते.

**इतिहास काय म्हणतो**

दुसऱ्या महायुद्धानंतर,मल्टी इफेक्ट फ्लॅश डिसेलिनेशन आणि मल्टी स्टेज फ्लॅश डिसेलिनेशन सारख्या अनेक तंत्रज्ञान विकसित किंवा सुधारित करण्यात आल्या. आणखी एक उल्लेखनीय तंत्रज्ञान म्हणजे फ्रीझ-थॉ डिसेलिनेशन,फ्रीझ-थॉ डिसेलिनेशन(क्रायो- डिसेलिनेशन किंवा एफ डी ),क्रिस्टलाय झेशन द्वारे खाऱ्या पाण्यातून विरघळलेले खनिजे वगळते.

१९५२ च्या खारटपाणी रूपांतरण कायद्यानुसार १९५५ मध्ये युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ इंटिरियर मध्ये खारट पाण्याचे कार्यालय तयार करण्यात आले.कॅलिफोर्निया आणि अंतर्देशीय पश्चिम युनायटेड स्टेट्समधील पाण्याच्या कमतरतेम ुळे हा कायदा प्रेरित झाला. गृह विभागाने पुढील प्रगतीसाठी संशोधन अनुदान,तज्ञ कर्मचारी, पेटंट डेटा आणि प्रयोगांसाठी जमीन यासह संसाधनांचे वाटप केले.

या प्रयत्नांच्या परिणामां मध्ये जागतिक स्तरावर २०० हून अधिक इलेक्ट्रोडायलिसिस आणि डिस्टिलेशन प्लांटचे बांधकाम, रिव्हर्स ऑस्मोसिस संशोधन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य (उदाहरणार्थ, १९६५ मध्ये पहिले आंतरराष्ट्रीय जल निर्लवणीकरण(डिसॅलिनेशन)

संगोष्ठी आणि प्रदर्शन यांचा समावेश होता.१९७४ मध्ये खारट पाण्याचे कार्यालय जलसंपत्ती संशोधन कार्यालयात विलीन झाले. दशकभराच्या प्रादेशिक दुष्काळानंतर १९६१ मध्ये फ्रीपोर्ट,टेक्सास येथे अमेरिकेतील पहिला औद्योगिक डिसॅलिनेशन प्लांट सुरू झाला. १९६० च्या दशकाच्या अखेरीस आणि १९७० च्या दशकाच्या सुरुवातीस, पारंपारिक थर्मल डिसॅलिनेशन युनिट्सची जागा घेण्यासाठी आरओने आशा दायक परिणाम दाखवण्यास सुरुवात केली.

कॅलिफोर्नियातील राज्य विद्यापीठांमध्ये, डाऊ केमि कल कंपनी आणि ड्यूपॉन्ट येथे संशोधन झाले. अनेक अभ्यास डिसॅलिनेशन सिस्टम ऑप्टिमाइझ करण्याच्या मार्गांवर लक्ष केंद्रित करतात. पहिला व्यावसायिक आरओ प्लांट,कोलिंगा डिसॅलिनेशन प्लांट,१९६५ मध्ये कॅलिफोर्निया मध्ये खाऱ्या पाण्यासाठी उघडण्यात आला.डॉ.सिडनी लोएब यांनी यूसीएलए मधील कर्मचाऱ्यां सह,आरओ वरील डेटा गोळा करण्यासाठी एक मोठा पायलट प्लांट डिझाइन केला,परंतु कोलिंगाच्या रहिवाशांना गोडे पाणी पुरवण्यात ते पुरेसे यशस्वी झाले. डीसॅलिनेशन तंत्रज्ञाना तील हा एक मैलाचा दगड होता, कारण त्याने आरओची व्यवहार्यता आणि विद्यमान तंत्रज्ञानाच्या तुलनेत त्याचे फायदे (कार्यक्षमता,फेज बदल आवश्यक नाही, सभोवतालचे तापमान ऑपरेशन, स्केलेबिलिटी आणि मानकी करणाची सोय) सिद्ध केले. काही वर्षांनंतर,१९७५ मध्ये, पहिला समुद्राच्या पाण्याचा रिव्हर्स ऑस्मोसिस डिसेलिनेशन प्लांट कार्यान्वित झाला.२००० पर्यंत, २००० हून अधिक कारखाने कार्यरत होते. त्यापैकी सर्वात मोठे कारखाने सौदी अरेबिया,इस्रायलआणि युएईमध्ये आहेत; आणि १,४०१,००० चौरस मीटर/दिवस आकारमानाचा सर्वात मोठा कारखाने सौदी अरेबिया (रस अल खैर) मध्ये आहे. या दशकात सौर आणि पवन ऊर्जा यासारख्या अक्षय ऊर्जा स्रोतांना डिसेलिनेशन सिस्टम मध्ये एकत्रित करण्यातही प्रगती झाली. जरी सुरुवातीला सुरुवातीच्या टप्प्यात असले तरी,या प्रयत्नांमुळे पर्यावरणीय दृष्ट्या शाश्वत डिसेलिनेशन पद्धतीं साठी मार्ग मोकळा झाला. २०१० आणि २०२० च्या दशकात पुढील पिढीतील पडद्यांचा उदय झाला, ज्यात ग्राफीन- आधारित पडदा, ॲक्वापोरिन-प्रेरित बायोमिमेटिक

**महाराष्ट्र सहयोग:**

भारतातील महाराष्ट्र राज्य थोरियम इंधनावर आधारित एक लहान मॉड्यूलर अणुभट्टी विकसित करण्यासाठी ‘रशियाच्या रॉस्टम नामक संस्थे‘ सोबत भागीदारी करत आहे,ज्याचे उद्दिष्ट व्यापारीकरण आणि स्थानिक असेंब्ली आहे.डिसॅलिनेशन ही एक प्रक्रिया आहे जी खाऱ्या पाण्यातील खनिज घटक काढून टाकते. सामान्यतः, डिसॅलिनेशन म्हणजे पदार्थातील क्षार आणि खनिजे काढून टाकणे. एक उदाहरण म्हणजे मातीचे डिसॅलिनेशन.हे शेतीसाठी महत्वाचे आहे.मानवी वापरासाठी किंवा सिंचनासाठी पाणी तयार करण्यासाठी खाऱ्या पाण्याचे, विशेषतः समुद्राच्या पाण्याचे डिसॅलिनेशन करणे शक्य आहे. डिसॅलिनेशन प्रक्रियेचे उप-उत्पादन म्हणजे खारे पाणी. अनेक समुद्री जहाजे आणि पाणबुड्या डिसॅलिनेशन वापरतात. डिसॅलिनेशन मध्ये आधुनिक रस प्रामुख्याने मानवी वापरासाठी गोड्या पाण्याच्या किफायतशीर पुरवठ्यावर केंद्रित आहे.डिसॅलिनेशन केलेल्या सांडपाण्यासोबत ते पावसा पासून स्वतंत्र असलेल्या काही जलस्रोतांपैकी एक आहे.

पडदा, सिरेमिक पडदा आणि नॅनोकंपोझिट्स यांचा समावेश होता. या पदार्थांमुळे पाण्याची पारगम्यता, निवडकता आणि दूषित होण्याच्या प्रतिकारात लक्षणीय सुधारणा झाली. असे अत्यंत अभ्यासु विवेचन करतांना जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी करतांना पुढे नमुद केले की,२०२१ पर्यंत २२,००० प्लांट कार्यरत होते. २०२४ मध्ये कॅटलान सरकारने बार्सिलोना बंदराजवळ एक तरंगता ऑफशोअर प्लांट स्थापित केला आणि तीव्र दुष्काळाचा सामना करण्यासाठी कोस्टा ब्राव्हाच्या उत्तरेकडील प्रदेशासाठी १२ मोबाईल डिसॅलिनेशन युनिट्स खरेदी केले.

२०१२ मध्ये, सरासरी किंमत प्रति घनमीटर ०.७५ होती. २०२२ पर्यंत, ती (महागाईपूर्वी) ०.४१ पर्यंत कमी झाली. डिसॅलिनेटेड पुरवठा १०% + चक्रवाढ दराने वाढत आहे, दर सात वर्षांनी विपुल प्रमाणात दुप्पट होत आहे.

२०२४ ते २०२५ दरम्यान, स्पेनने अलीकडेच कॅसाब्लांका येथे आफ्रिकेतील सर्वात मोठा डिसॅलिनेशन प्लांट बांधण्या साठी रू. ३४० दशलक्ष गुंतवणुकीची घोषणा केली आहे, जे मोठ्या प्रमाणात डिसॅलिनेशन पायाभूत सुविधांचे वाढते महत्त्व दर्शवते. अशी जगाची स्थिती असुन महाराष्ट्र शासनाने आता अधिकची प्रगती पिण्याचे पाणी व सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रचंड परिश्रम तथा मेहनत घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजितदादा पवार आणि पारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांना सर्व कस पणाला लावावा लागेल. या प्रकल्पासाठी समन्वय आणि संशोधन सुलभ करण्यासाठी एक संयुक्त कार्यगट स्थापन करण्याची गरज असुन प्रकल्पाच्या अंमल बजावणीत स्वाक्षरी करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी महाजेनको, रोसाटॉम ऊर्जा प्रकल्प,मित्रा आणि ग्लोबल तंत्रज्ञान आघाडी यांच्या सह या क्षेत्रात कार्यरत एन जी ओ यांची मदत घेऊन नव्हे या स्वयंसेवी संस्थेचा सहभाग आवश्यक ठरणार असुन अंमलबजावणी दरम्यान भारत सरकारने अणुऊर्जेसाठी घालून दिलेल्या सर्व कायदेशीर तरतुदी आणि सुरक्षा प्रोटोकॉलचे काटेकोरपणे पालन केल्यास समुद्राचे क्षार युक्त खारट पाणी पिण्यासाठी व सिंचना साठी लिलया पद्धतीने हा ‘ गेम चेंजर ‘ प्रकल्प ठरू शकतो असे आग्रही प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव व जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.